महाराष्ट्र शासन

# अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय

## सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली

## वारणाली विश्रामबाग, सांगली

ई-मेल :- sesicsangli@gmail.com दूरध्वनी क्रमांक- ०२३३-२३०२७०९,
फॅक्स क्रमांक- ०२०-२३०२६४३

# सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३ दि. १७-१२-२०१६ अनुसार खालील संवर्गातील फक्त जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना करार पद्धतीवर या मंडळांतर्गत कार्यरत असलेल्या विभागांतर्गत सांगली/ सातारा/ जिल्ह्यांतर्गत **क्षेत्रीयस्तरावरील सिंचन व्यवस्थापन व बांधकामाधीन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी** जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नेमणूक करार पद्धतीने एक वर्षासाठी करावयाची आहे. सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांची सेवा अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांचे अधिनस्थ कामासाठी राहील. सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सिंचन व बांधकाम प्रकारचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज **कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सांगली वारणाली वसाहत, विश्रामबाग, सांगली ४१६४१५** यांच्याकडे **दिनांक ३१-०७-२०२३ ते दिनांक १७-०८-२०२३ पर्यंत (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत)** प्राप्त होतील याप्रमाणे पोस्टाद्वारे सादर करावेत किंवा प्रत्यक्ष द्यावेत. अर्जाचे पाकिटावर सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या करार पद्धतीवर नेमणूक करण्याबाबत असे स्पष्ट लिहून ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे. त्या पदाचे नाव लिहिण्यात यावे. नियोजित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. सदर नेमणुका समितीच्या मुलाखतीद्वारे करण्यात येईल. सदर नेमणुकीचे आदेश हे शासनाच्या अंतिम मान्यतेनंतरच निर्गमित करण्यात येतील.

**करार पद्धतीवर भरावयाचा पदाचा तपशील खालीलप्रमाणे-**

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशील | जलसंपदा विभागातून खालील पदावरुन सेवानिवृत्त |
|---|---|---|---|
| १ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (पदाची संख्या १०)** | क्षेत्रीयस्तरावरील सिंचन/ बांधकामाधीन प्रकल्पांची भूसंपादनाची कामे तसेच न्यायालयीन प्रकरणे | सेवानिवृत्त सहा.अभि. श्रेणी.२ / कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता/ उपविभागीय अभियंता/ अधिकारी (स्थापत्य) |

सदर नेमणुकीकरिता लागू असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा मा. मुख्य अभियंता, (जसं) जलसंपदा विभाग, पुणे मंगळवार पेठ, बारणे रोड, पुणे. **www.cewrd.com** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज व अटी/ शर्ती, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सांगली या कार्यालयात संबंधित उपकार्यकारी अभियंता यांच्याकडे उपलब्ध आहे.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सांगली वारणाली विश्रामबाग, सांगली पिन ४१६४१५ | ०२३३-२३०२६५४ |

**सदर नेमणुका या खाली सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील-**

१. करारपद्धतीवर नेमणुकीकरिता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचे वय दिनांक ३१-०७-२०२३ रोजी ६३ वर्षापेक्षा अधिक नसावे.
२. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यास ज्या पदासाठी अर्ज केले आहे. त्या पदाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
३. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावी, याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले आहे, त्या संबंधित कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र घेण्यात यावे.
४. करारपद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु. १००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देण्यात यावा.
५. नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहित कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७-१२-२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम पारिश्रमिक वेतन म्हणून मिळेल **मर्यादित ४०,०००/- (मर्यादित चाळीस हजार)** (अशंराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांना अनुज्ञेय राहील.
६. नियुक्ती प्राधिकारी (अधीक्षक अभियंता) यांना विशेष परिस्थिती कोणत्याही वेळी करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहील.
७. करारपद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.
८. क्षेत्रीयस्तरावर करारपद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्भवल्यास कार्यालय/ शासन बांधील राहणार नाही.
९. करारपद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमणूक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/ हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच नियुक्त उमेदवारास कोणतेही वित्तीय व प्रशासकीय अधिकार नसतील.
१०. अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत/ निवृत्तीचे कागदपत्र सादर करावेत. माहे डिसेंबर २०२३ पर्यंत सेवानिवृत्त होणारे कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२/ उपविभागीय अभियंता/ अधिकारी अर्ज करू शकतात, तथापि त्यांचा अर्ज सेवानिवृत्तीनंतर विचारात घेण्यात येईल.
११. करारपद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्त आपोआप संपुष्टात येईल.
१२. सदर नेमणूक १ वर्षाच्या पुढे वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.
१३. करारपद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी, तसेच त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
१४. यापूर्वी सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता/ अधिकारी शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता यांनी करारपद्धतीने नियुक्तीसाठी अर्ज केला असेल अथवा यापूर्वी तीन वर्ष ज्यांनी करारपद्धतीने काम केले असले अशा सेवानिवृत्त अभियंतानी पुन्हा अर्ज करू नये त्यांचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

मुलाखतीकरिता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलव्दारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघु संदेशाद्वारे कळविण्यात येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सांगली यांचे सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येत आहे व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल, तसेच अंतिम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तिक ई-मेलवर कळविण्यात येईल.

उपरोक्त १ ते १५ अटी व शर्ती मला मान्य आहेत याबाबतचे अर्जदाराने रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील. सदर नियुक्ती आवश्यक सिंचन व बांधकाम कामासाठी करण्यात येत असून, त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे.

**अधीक्षक अभियंता**
**सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली**
**सांगली**

---

## विहित नमुन्यातील अर्ज पायाभूत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट

**कनिष्ठ अभियंता संवर्ग (करार)** या पदासाठी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा विविध कामाकरिता करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबतचा अर्ज

प्रति,

**मा. अधीक्षक अभियंता**
**सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली,**
**वारणाली विश्रामबाग, सांगली- ४१५४१६**

उमेदवाराचे अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटावे.

**अर्ज केलेल्या पदाचे नाव :** -------------------

१. अर्जदाराचे नाव :
२. कायमचा पत्ता :
३. दूरध्वनी क्रमांक :
भ्रमणध्वनीसह (अनिवार्य) :
४. ई-मेल (अनिवार्य) :
५. सध्याचा पत्ता :
६. जन्मतारीख :
७. राष्ट्रीयीत्व :
८. प्रवर्ग :
९. लिंग (पुरुष/ महिला) :
१०. अवगत भाषा :
११. शैक्षणिक माहिती :

| अ.क्र. | परीक्षा | वर्ष | विषय | शाळा/ कॉलेजचे नाव | बोर्ड/ विद्यापीठ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |

१२. इतर शैक्षणिक माहिती (संगणक इत्यादी) :

| अ.क्र. | अभ्यासक्रम | वर्ष | संस्थेचे (प्रायोजक) नाव |
|---|---|---|---|
| १ | | | |

१३. अनुभव :

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

१४. सेवानिवृत्तीचा दिनांक :
१५. कोणत्या जिल्ह्यात काम करण्यास इच्छुक आहे त्या जिल्ह्याचे नाव :
१६. सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशील :

मला पूर्णपणे माहिती आहे की, पायाभूत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंटद्वारे प्रकल्पाचे क्षेत्रीय कामाकरिता सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी कनिष्ठ अभियंता या पदाकरिता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे प्रकल्पाचे कामासाठी १ वर्षाकरिता आहे व कामाचे व्याप्तीप्रमाणे कमी/ अधिक करण्यात येतील. कामाच्या निकडीनुसार सांगली/ सोलापूर/ सातारा जिल्ह्यांतील कोणत्याही तालुक्यात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहितीप्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्व सूचनेशिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

**ठिकाण :** **अर्जदाराची सही :**
**दिनांक:** **नाव :**
**सहपत्र :**

डी.जी.आय.पी.आर./२०२३-२४/C २३०९